2 Aebu

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Research Journal

# Vidyawarta®

Issue-18, Vol-07, April to June 2017

Editor
Dr.Bapu G. Gholap

www.vidyawarta.com

14) Effect of Yogic Practices on Social Stress of Engineering College Students
**Prof. Dr. Hemlata Kolhe, Nagpur, Ujwala Tikhe Kandalkar, Pusad** || 56

15) The Roles of Artificial Intelligence in Education: Current Progress and.....
**Dr. Subhash Kundlikrao Zinjurde, Ahemdnagar** || 59

16) Mechanism of reaction involving organic molecules of biochemical ....
**Bijay kumar Nandy, Alok Ranjan Pradhan, Odisha.** || 67

17) 'राजकीय दहशतवाद'
**प्रा. बी. बी. सुरजबन्सी, दिपक तुकाराम आचार्य, औरंगाबाद.** || 73

18) भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या - कारणे व उपाय
**डॉ. बोंडगे संजय गजानन, बीड** || 77

19) राजर्षी शाहू महाराजांचे जाती निर्मुलनासाठी प्रयत्न
**सचिन गुंडीराम डेंगळे, नांदेड** || 81

20) स्त्री भ्रूणहत्येची विद्यमान काळातील प्रासंगिकता
**डॉ. देशमुख एम. बी., जि. बीड** || 83

21) लोकसाहित्य संकल्पना
**प्रा. दिलीप टी. जाधव, नाशिक** || 86

22) पर्यावरणीय समस्येची मुळ कारणे व पर्यावरणीय नीतिशास्त्र
**डॉ. संजय ह. पाटील, देगलूर.** || 91

23) मानसिक स्वास्थ्य आणि संगीत
**गजानन रमेशराव रत्नपारखी, अमरावती.** || 96

24) जागतिकीकरणातील मराठी कादंबरी
**डॉ. अरुण कोळी, औरंगाबाद, प्रा. देविदास शिंदे, नाशिक** || 99

25) ई-बुक्स : काळाची गरज
**डॉ. अतुल दि. वानखडे, अमरावती.** || 101

26) १९८० नंतरची ग्रामीण कविता : शोध आणि बोध
**डॉ. सोपान सुरवसे, बीड** || 103

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

आधुनिक साहित्य विश्व निर्मितीत थांबली हा समज पूर्ण चुकीचे आहे. अनामिकतेची निख्खल अभिव्यकी हेतशुध्द साहित्य निर्माण करु शकत नाही. हेतू शुध्द साहित्य निर्मितीला मात्र लोकवाङ्मयाचा आधार घ्यावाच लागतो. म्हणून लोकवाङ्मय संकल्पना नव्याने समजावून घेणे, मानवी मुल्य संस्कृती यांचा व कलाविश्वाचा परिचय होणे याकरता नव्या युगापुढे लोकवाङ्मय संकल्पना व प्रकार मांडणे आवश्यक वाटते. पूर्वीचा धागा धरुनच कोणी स्वनिर्मित धाग्यांचे नक्षीदार जाळे निर्माण करतो. तसेच जीवनाचे जाळे विनताना लोकसंस्कृती, लोकजीवन व कला यांचा आधार नव्या पिढीला घ्यावाच लागेल अन्यथा दरीत दिवा विझाव, विहीरीत दोर कापला जावा अशी समाजाची स्थिती होईल.

**संदर्भ -**

१) लोकसाहित्य दर्शन - प्राचार्य डॉ. शिवाजीराव मोहिते, गौरवग्रंथ - संपा. डॉ. रमेश देवरे, कर्मवीर प्रकाशन, प्र. आ. २००९

२) मराठी लोकसंस्कृतीच्या पाऊलखुणा - डॉ. मधुकर मोकाशी, स्नेहवर्धन प्रकाशन - प्र. आ. २०१०.

३) लोकवाङ्मय - चअठ ३०५, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्र. आ. २००२.

४) लोकसाहित्याची रुपरेषा - दुर्गा भागवत, दु. आ. वरदा बुक्स १९७७

५) लोकसाहित्य मीमांसा - विश्वनाथ शिंदे, स्नेहवर्धन प्रकाशन, पब्लिकेशन हाऊस १९८९.

६) लोकसाहित्याचे अंत:प्रवाह पुणे कॉन्टिनेंटर प्रकाशन १९७५

७) लोकवाङ्मय रुप स्वरूप - डॉ. शरद व्यवहारे - साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद-१९९१

❑❑❑

**22**

# पर्यावरणीय समस्येची मुळ कारणे व पर्यावरणीय नीतिशास्त्र

**डॉ.संजय ह. पाटील**
तत्वज्ञान विभागप्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर.

**********

**प्रास्ताविक :-**

साधनसंपत्तीचा ऱ्हास, पृथ्वीवरील नैसर्गिक परिसंस्थामधील बिघाड आणि पर्यावरणाचा दर्जा याविषयीच्या जिज्ञासेत गेल्या दशकांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. प्रदूषण, पारिस्थितीक आणि पर्यावरण हे विषय विज्ञानाच्या बंदिस्त चौकटीतून आता सार्वजनिक चर्चेत आणले गेले असून, माणसांकडून त्यांच्या पर्यावरणाचा जो वापर होतो त्याविषयी अत्यंत आत्मीयतेने सर्वांगीण चर्चा होत आहे. पर्यावरणात गेल्या काही वर्षात होणाऱ्या बदलांच्या (विशेष करुन माणसांकडून होणाऱ्या बदलांच्या) गतीमुळे आणि त्याच्या स्वरुपामुळे वैश्विक स्तरांवरचे काही वैज्ञानिक प्रश्न आपल्यामुळे पुढे उभे ठाकले आहेत. यात लोकसंख्येचा स्फोट, उर्जा संसाधने आणि वापर, अन्नपुरवठ्याचा प्रश्न, कच्चा मालाचा वापर, नामशेष होण्याचा धोका असणाऱ्या प्राणी व वनस्पतींच्या प्रजाती आणि प्रदूषण जागतिक तापमान यांचा समावेश आहे. हे बदल बऱ्याच वेगाने आणि व्यापक प्रमाणावर झाले आहेत. ही सर्व परिस्थिती पाहता दासमन म्हणतो, "माणूस म्हणजे हाती कोलीत असलेले एक माकड झाले आहे, [illegible]"[१]. वरील सर्व समस्यांचा अभ्यास केला असता त्याची मुळ कारणे खालील प्रमाणे पाहता येईल.

**पर्यावरणीय समस्यांची कारणे (Cause of Environmental Problems) :-**

सध्या असलेल्या पर्यावरणीय समस्यांची विविध लक्षणे जितकी आहेत, तितकीच त्यांच्या मूळ कारणांबाबतच्या दृष्टीकोनाचीही संख्या आहे. या साऱ्याचे चार मुख्य भागात वर्गीकरण करता येईल, ते पुढीलप्रमाणे.

१) "माणसाचा बदलता धार्मिक दृष्टीकोण आणि त्याची पर्यावरणातील भूमिका.

२) अलीकडच्या काळात झालेला लोकसंख्येचा स्फोट.

३) सर्वसाधारणपणे वाढलेली समृध्दी आणि आर्थिक वृध्दी.

४) उत्पादक तंत्रज्ञानात झालेला बदल'' [१]. यावर भर देण्यात येतो.

**१)** काही जणांना पश्चिम युरोप आणि उत्तर अमेरिकेत पर्यावरणीय बदलाला कारणीभूत ठरलेल्या माणसांच्या शोषक वृत्तीमागे ज्यू-ख्रिश्चन धार्मिक परंपरा हे कारण दिसले. या विचारधोत माणूस हा अन्य सर्व सजीवांपेक्षा श्रेष्ठ आहे, आणि अन्य सारे कांही त्याच्या वापरासाठी किंवा रंजनासाठी निर्मिण्यात आले आहे, असे मानले जाते.

ज्यू-ख्रिश्चन धार्मिक विचारसरणी ही मनुष्यकेंद्रिततेवर आधारित आहे. मनुष्यजीवन हे सहसा धार्मिक तत्वज्ञानामार्फतच नियंत्रित केले जाते. वर उल्लेखिलेल्या धार्मिक विचारधारांवरच माणूस पुढे निसर्गाचे शोषण करीत राहिला. त्याला त्याचे काहीह वाटत नव्हते. आपण पर्यावरणाचे शोषण करतो व इतर जीवांवर प्रभुत्व गाजवतो, आपल्या हितासाठी अतिक्रमण करतो यात त्याला काहीही अनैतिक वाटत नव्हते. ही विचारसरणी खालीलप्रमाणे थोडक्यात पाहता येईल.

ज्यूंच्या दृष्टीने जुना करार, तर ख्रिश्चनांच्या दृष्टीने नवा करार व जुना करार मिळून तयार झालेले बायबल आधारभूत आहे. एका प्रवचनामध्ये येशु ख्रिस्त असा निर्वाळा देतात की, जुन्या करारातील शब्द न् शब्द आम्हाला प्रमाणभूत आहे. एवढेच नाही तर जुन्या करारातील जी नैतिक शिकवण, आहे तिला मी अधिक व्यापक रुप देण्यासाठी जन्माला आलो आहे. या ग्रंथाच्या आरंभी विश्वोत्पत्तीची कथा आहे. त्यात ''सागरातील मासे आणि वातावरणातील पक्षी, गुरे आणि सारी पृथ्वी व पृथ्वीवर वावरणाऱ्या प्रत्येक जीवावर प्रभुत्व गाजवण्यासाठी परमेश्वराने माणसाची निर्मिती केली आहे.'' असे सांगण्यात आले आहे. (१:२६) ''माणसाचा हुकूमनामा असेच त्याला केवळ ज्यू - ख्रिश्चनांनीच नाही तर मुस्लिमांनीसुध्दा मानले. त्यातून त्याने पृथ्वी आणि तीवरील साऱ्या अधिवासांना दुय्यमत्व देण्याचा अधिकार दिला आहे.''[३] तेव्हा जेनेसीसमध्ये माणूस काय करु शकतो, हेच केवळ सांगण्यात आले नाही, तर त्याने काय केले पाहिजे हेही सांगण्यात आले आहे. **'पृथ्वीला संपन्न करा आणि नमवा'.**

पतनानंतर, प्रलयानंतरच्या कालखंडामध्ये परमेश्वराने नोहाला पुढील उपदेश दिला. ''पृथ्वीला फलदायी करा, तिला संपन्न करा आणि नमवा. तुमची दहशत ही पृथ्वीवर, साऱ्या पशुवंर, वातावरणातील साऱ्या पक्ष्यांवर आणि पृथ्वीवर जे काही म्हणून हालचाल करते त्याच्यावर आणि साऱ्या सागरातील माशांवर असेल, तर सारे तुझ्या हाती सोपवण्यात येत आहेत. जिवंत अशी प्रत्येक चल गोष्ट ही तुझ्यासाठी आहार म्हणून असेल''[३]. यातूनच माणसास पशुचे मांस खाण्याची परवानगी मिळाली आहे. वरील उताऱ्यावरुन ज्यू ख्रिश्चन यांची धार्मिक भूमिका लक्षात येते. याच प्रमाणे मनमानीप्रमाणे इतर साऱ्या जीवांचा वापर करण्याचा माणसाला विशेषधिकार आहे. ही भूमिका पाश्चात्य विचारांच्या इतिहासामध्ये फार जुनी आहे.

**२) लोकसंख्येचा स्फोट : (Explosion of Population):-**

पर्यावरणाच्या ऱ्हासास, अलीकडच्या काळात लोकसंख्येत जी वाढ झाली आहे ती जबाबदार आहे, की सामाजिक पध्दती जबाबदार आहे, की तंत्रज्ञान जबाबदार याबाबतच्या परस्परविरोधी दृष्टीकोनांवरचं बहुतांशी चर्चा केंद्रीत झालेली आहे.

पृथ्वी किती प्रमाणात मानवी लोकसंख्येचा भार सोसू शकेल, याची काही सांख्यिकी मर्यादा असेल हे मान्य केले पाहिजे. लोकसंख्येच्या दबावामुळे मोठ्या प्रमाणात संसाधनांची मागणी वाढते. सीमित नैसर्गिक संसाधन आणि वाजवीपेक्षा जास्त मागणी यातूनच मग संसाधनांचा ऱ्हास सुरु होतो. या दुष्टचक्रातून मग प्रदूषणाचे, शहरीकरणाचे गंभीर असे प्रश्न निर्माण होतात. म्हणून पर्यावरण ऱ्हासास लोकसंख्या वाढ कारणीभूत आहे असे म्हणता येईल.

**३) वाढती समृध्दी आणि आर्थिक वृध्दी : (Economic Growth) :-**

आर्थिक वृध्दींशी संबंधित असलेली सर्वसाधारणपणे जी समृध्दी वाढली. (म्हणजेच दरडोई वाढलेला नैसर्गिक संसाधनांचा उपभोग) अर्थात ही बाबही अलीकडच्या काळातील संकटाचा एक महत्वाचा घटक आहे. याकडेही लक्ष वेधण्यात येत आहे.

आर्थिक वाढ रोखणे आणि त्याच वेळी पर्यावरणीय समतोल राखणे या परस्परांशी न जमणाऱ्या बाबीच आहेत. कारण सर्वच प्रकारच्या नियोजनामध्ये यापैकी एकाला दुसऱ्यापेक्षा वरचढच ठेवावे लागते, असे शुमाकरने निदर्शनाला आणून दिले आहे.

माणसाने अधिकाधिक उपभोग घ्यावेत, त्यातून आर्थिक विकास घडून येईल असे प्रचलीत अर्थशास्त्र सांगते मात्र यातून माणसाची फक्त हावच वाढते. त्याने कोठे थांबावे याबद्दल कोठेच मार्गदर्शन नाही. ''हाव, असूया या मानवी दुर्गूणांची जर पध्दतीशीरपणे जोपासना केली गेली, तर त्याचा अपरिहार्य परिणाम बुध्दिनाशात होणार हे निश्चित आहे. कारण दुर्गूणांनी प्रेरित असा माणूस कोणत्याही गोष्टीकडे साकल्याने, पूर्णत्वाने पाहण्याची शक्ती गमावून बसतो नि परिणामत: त्याचे यश हेच अपयश ठरते. अशा दुर्गूणांनी युक्त समाज व्यवहारात भव्य-दिव्य असे काही घडवूही शकेल, पण जीवनाच्या प्राथमिक समस्या तो सोडवू शकत नाही''[५]. यातून अखेर विनाशच होतो. प्रचलित प्रतिमानात भौतिक वाढीला अतोनात महत्व आले

आहे. पण वाढीतले गुणात्मक भेद पूर्णपणे दुर्लक्षून केवळ संख्यात्मक वाढ ही शुमाकरला मान्य नाही, तो म्हणतो. "वाढ या संकल्पनेवर सगळ्यांचा विश्वास असतो, कारण ते जीवंतपणाचे लक्षण आहे. पण वाढीला काही एक गुणात्मक परिणाम दिले गेले पाहिजे. व्यवहारात अनेक गोष्टीत 'वाढ होणे' आवश्यक असते. पण त्याच्याच जोडीला अनेक गोष्टीत 'घट होणे' आवश्यक असते"[६]. अशा प्रकारे गुणात्मकतेकडे दुर्लक्ष करून केवळ संख्यात्मक बार्बीचाच विचार करणे, हा अर्थशास्त्राचा एक दोष म्हणता येईल. केवळ 'संख्यात्मक वाढ' या एकाच उद्दिष्टात आजचे अर्थशास्त्र कसे पछाडले आहे, हे सांगताना शुमाकर म्हणतो, "एखाद्या देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न अमुक टक्याने वाढले असे आकडेवारीच्या आधारे निश्चित केल्यावर ती गोष्ट चांगली की वाईट हे अर्थशास्त्रज्ञ खात्रीपूर्वक सांगू शकत नाहीत. ते ठरविण्याची त्यांना इच्छाही नसते. वाढही रोगटही असू शकते, विकृतही असू शकते, घातकही असू शकते. हा विचार ते समोर येऊनही देत नाहीत. आता मोजके अर्थशास्त्रज्ञ अशी वाढ किती काळ शक्य आहे, हे विचारु लागले आहेत. कारण मर्यादीत पर्यावरणात अमर्याद वाढ असंभाव्य आहे"[७].

वाढ या संकल्पनेविषयी आणखी एक पैलू असा की ती शाश्वत आहे की नाही, हेदेखील अर्थशास्त्र पाहत नाहीत. त्यांच्यादृष्टीने ही एक गंभीर चूकच आहे. ते म्हणतात, "आपण शाश्वततेचेचे अर्थशास्त्र शिकले पाहिजे. आर्थिक शहाणपणाची मध्यवर्ती संकल्पना शाश्वतता (Sustainable) ही आहे. जोवर एखादी गोष्ट दीर्घकाळपर्यंत निरंतर चालू राहण्याची शक्यता दिसत नाही, तोवर ती अर्थशास्त्राच्यादृष्टीने निरर्थक ठरते"[८].

आजची आपली वाढ अशी नाही, हे उघडच आहे. ती पर्यावरणाची हानी करुन स्वतःचेच भवितव्य धोक्यात घालणारी आत्मविनाशक अशी आहे. म्हणूनही या दृष्टिकोणातून विचार करता शाश्वत विकासाची कास धरुन उद्भवलेल्या समस्येवर तोडगा निघू शकतो. असा एक विचार सध्या जोर धरत आहे.

**४) फायद्याचे तंत्रज्ञान : (Beneficiary Technology) :-**

जास्तीत जास्त वस्तूंचा उपभोग घेणे हा समृध्द जीवन जगण्याचा मूलमंत्र आहे. हे तत्वज्ञान आधुनिक अर्थशास्त्राने दाखवल्यानंतर साहजिकच जास्तीत जास्त उत्पादन करणारे फायद्याचे तंत्रज्ञान प्रचलित होणे हे ओघाने आलेच. आज नैसर्गिक संसाधनांचा वापर करुन जास्तीत जास्त उत्पादन करणाऱ्या फायद्याच्या तंत्रज्ञानाशी पर्यावरणीय समस्या कशी निगडीत आहेत हे पुढीलप्रमाणे दिसून येईल.

विसाव्या शतकात उत्तरार्धात दुसऱ्या महायुध्दानंतरच्या तीन दशकांत सर्वच निसर्ग शास्त्रात वेगाने प्रगती झाली. तंत्रज्ञान विकासाच्या इतिहासात हा काळ सर्वात महत्वाचा मानला जातो. तंत्रविकासाचे काही चांगले तर काही वाईट परिणाम होत असतात. उदा : उर्जेसाठी अणुउर्जेचा पर्याय निर्माण झाला, पण अणुस्फोट व उत्सर्जनाचे दुष्परिणाम या पर्यावरणीय आपत्ती (Environmental Hazards) निर्माण झाल्या. कोळशाला खनिज तेलाचा पर्याय उपलब्ध झाला, पण तेल गळती तसेच ज्वलनामुळे वायुप्रदूषण यात वाढ झाली.

औद्योगिक क्रांतीमुळे उद्योग-धंद्याचे क्षेत्र वाढले. नागरीकरण वेगाने होऊ लागले, त्याचबरोबर, प्रदूषण, झोपडपट्या, पर्यावरणाचे अवमूल्यन यांच्यात वाढ झाली. यामुळे पर्यावरणातील, तंत्रज्ञानातील बदल आणि मानवी क्रिया यांच्यातील संबंध बिघडत गेले. परिणामी तंत्रज्ञानाच्या उपयोगाबरोबर त्यातील बदलांचे विकृत परिणाम पर्यावरणात दिसू लागले.

तंत्रज्ञानांची उत्क्रांती होत असताना पर्यावरणावर कोणते परिणाम होतील व त्यामुळे जीव समूहांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागेल, याचा तर्कशुध्द विचार किंवा अभ्यास दूर्लक्षित झाला. अल्पकालीन फायद्यांचा विचार वेगाने पुढे आला व दीर्घकालीन परिणामांकडे, नुकसानीकडे दूर्लक्ष झाले. मोठ्या प्रमाणावर संसाधनाचा वापर करीत असताना संसाधने हे मर्यादीत आहेत याकडे कानाडोळा करुन भावी पिढ्यांचे हक्क, त्यांच्यासाठी असणारा पर्यावरणीय वारसा यावर सुध्दा आपण अतिक्रमण करीत आहोत, याचे साधे भानही आपल्याला राहीले नाही.

ज्यू-ख्रिश्चन धार्मिक विचारधारा, लोकसंख्यावाढ, आर्थिक वृध्दी (आधुनिक अर्थशास्त्र) व तंत्रज्ञानाचा वाढता विस्तार ही प्रमुख कारणे पर्यावरणसमस्यांच्या मुळाशी आहेत असे दिसून येते. विज्ञानाच्या प्रचलित प्रतिमानाधारे प्रस्तुत समस्यांच्या अभ्यास करताना काही मर्यादा दिसून येतात. तेंव्हा या समस्यांचे स्वरुप समजावून घ्यावयाचे असेल, तर त्याचा मुलभूत विचार करावा लागतो व तो मार्ग नीतिशास्त्र व तत्वज्ञानाचा असू शकतो. म्हणून सर्वांत पहिल्यांदा आपल्याला पर्यावरण नीतिशास्त्र म्हणजे काय हे पाहावे लागेल. पर्यावरणीय नीतिशास्त्रात पारंपारिक नीतिशास्त्राच्याही पलीकडे जावून पर्यावरणीय समस्यांच्या मुळाशी असणाऱ्या तत्वांचा वेध घेतला जातो. तो खालील प्रमाणे.

**पर्यावरणीय नीतिशास्त्र म्हणजे काय : (Defination of Environmental Ehics) :-**

१) "पर्यावरणीय नीतिशास्त्र म्हणजे माणूस-निसर्ग यांच्या संबंधाबाबतच्या आदर्शात्मक मुद्दे आणि तत्वांचा अभ्यास."[१]

२) "माणूस व त्याच्या नैसर्गिक पर्यावरणाशी असलेल्या संबंधाबाबतचे आदर्शात्मक मुद्दे आणि तत्वे यांचा अभ्यास म्हणजे

पर्यावरणीय नीतिशास्त्र होय. वैयक्तिक आणि संस्थात्मक मानवी कृती, जीवनपध्दती आणि धोरणे यांचा त्यात अभ्यास होतो''[१०].

३) ''मानवाचा निसर्गाशी संबंध कोणत्या प्रकारचा असावा हा प्रश्न मूल्यात्मक (Normative) स्वरुपाचा आहे. या प्रश्नांचे उत्तर मानवाची निसर्गविषयक असलेली वृत्ती कोणत्या प्रकारची आहे. यावर अवलंबून आहे. तसेच मानवाचा स्वतः विषयीचा दृष्टीकोन काय आहे, यावरही या प्रश्नाचे उत्तर अवलंबून आहे''[११].

जेंव्हा पर्यावरणीय नीतिशास्त्र असे आपण म्हणतो त्यावेळेस पर्यावरणीय समस्यांचा तात्विक वेध घेण्याचा प्रयत्न करीत असतो. ''तेंव्हा पर्यावरणीय नीतिशास्त्र म्हणजे आपल्या पर्यावरणाशी आपण कसे वागावे हे सांगणारी तत्वे, मूल्ये किंवा नियम यांचा संच असतो''[१२].

प्रत्यक्ष व्यवहारात वापर केल्या जाणाऱ्या नैतिक मुद्यांचा तात्विक अभ्यास उपयोजित नीतिशास्त्रात केला जातो. पर्यावरणीय नीतिशास्त्र हा त्याचाच एक भाग आहे.

**मूलभुत नैतिक मुद्दे : (Fundamental Ethical Issuies):-**

आपल्यापुढे पहिला मूलभुत सवाल आहे. तपशिलवार धोरणे, विहितके आदींच्या स्वरुपात असणाऱ्या पर्यावरणीय नीतिशास्त्राच्या मुळाशी मूलभुत मूल्ये कोणती ? या प्रश्नांवरील उत्तरे दोन असल्याने आपल्याला सकृदर्शनी दिसून येतात.

पहिल्या भूमिकेनूसार मूलभूत नीतिशास्त्रामध्ये पर्यावरणीय असे काहीही विशेष वेगळे नाही. मूलभूत नीतिशास्त्रात मूलभूत नैतिक मूल्यांचा अभ्यास केला जातो. मानवी समाजात मानवी वर्तन कसे असावे याचे नियमन करणे व पर्यावरणाचा मुद्दा आपल्या ध्यानात असो वा नसो मानवाला स्वीकारार्ह ठरेल, असे कल्याण साध्य करणे हा त्यांच्या उद्देश आहे. तथापि, आधुनिक जगात या मूल्यांचे उपयोजन करण्याचे एक महत्वाचे क्षेत्र पर्यावरणाशी असलेला आपला संबंध आणि त्याला आपणाकडून मिळणारी वर्तणूक ही आहे.

तथापि, दूसरी भूमिका फार वेगळी आहे, नैर्सगिक पर्यावरणाशी असलेल्या आपल्या नात्यांचा विचार करताना महत्वाची नैतिक मूल्ये त्याच नात्यांमधून तयार होतात. याची आपण नोंद घेणे आवश्यक आहे. नैर्सगिक विश्वाशी असलेल्या आपल्या नात्याच्या मुळाशी मानवी सामाजिक नात्यांच्या पलीकडे काही नैतिक आधार आहेत. या दुसऱ्या भूमिकेच्या अनुषंगाने पर्यावरणीय नीतिशास्त्राचे तत्व आणि त्याचा प्रत्यक्षात धोरण उपयोजन आणि विहितक या दृष्टीने वेगळेपण आहे.

पहिल्या भूमिकेच्या दृष्टिकोणातून विचार केल्यास वनसंपदा प्रजातींचे वैविध्य असलेल्या क्षेत्रांचे संरक्षण करणे, प्रदूषण टाळणे यांसारख्या गोष्टी महत्वाच्या का आहेत ? कारण त्यातून मानवाचे कल्याण साधले जाते. मानवाच्या अस्तित्वासाठी या गोष्टी आवश्यक आहेत, म्हणजेच या बाबतीत आपली नीतिमत्ता सरळसरळ मानवकेंद्रीत आहे. येथे निसर्गाला काही मूल्य आहे म्हणून सांगितली जात नाही, तर अखेर मानवाची ही वृत्ती पर्यावरणीय निकोप प्रथा आणि मानसिकदृष्ट्या निरोगी अवस्थेसाठी सांगितली जाते.

दुसऱ्या भूमिकेतून विचार केल्यास निसर्गकेंद्रीत (पर्यावरणकेंद्रीत) नीतिशास्त्रही आहे. यामध्ये एकंदर जीवन हे काही आदरणीय आणि वृध्दीयोग्य मूल्य असणारे आहे, असे मानले जाते. त्यामुळे पर्यावरणाची हानी करणाऱ्या प्रथा चुकीच्या ठरतात. त्यामुळे मानवाच्या दूरगामी हितसंबंधावरच नकारात्मक परिणाम होतो, असे नाही तर त्यामुळे मानवाच्या दूरगामी हितसंबंधावरच नकारात्मक परिणाम होतो,अ से नाही तर त्यामुळे स्वाभाविक मूल्यवान असलेल्या परिसंस्थांची (Ecosystem) हानी होते. मानवाच्या हितापासून पूर्ण स्वतंत्र असे कल्याण असलेल्या वनस्पती, प्राणी, परिस्थिती आणि एकुणच जीवनाचा नाश होतो. स्वाभाविक मूल्यवान (Intrinsically Valuable) असलेले वैविध्य कमी होते, निरपेक्ष सौंदर्याचा ऱ्हास होतो, तसेच तत्सम परिणाम होतात. अशीच भूमिका अल्डो लिओपोल्डने लॅंड एथिक म्हणून मांडली. ''जैविक समुदायाची एकात्मता स्थैर्य व सौंदर्य यांचे संवर्धन करणारी गोष्ट योग्य असते तर त्या विरुध्द जाणारी गोष्ट अयोग्य असते''[१३]. या दृष्टीने मानव हा नीतिशास्त्राचा केंद्रबिंदू नसून तो जैविक समुदायातील इतर अनेकांसोबतच एक सदस्य असतो.

वरील विचारांमध्ये एक महत्वाचा मुद्दा उपस्थित होतो तो हा की, ''जीवनालाच काही मूल्य आहे का ? जाणीव किंवा सुख दुःख समजण्याची शक्ती यासारखे वैशिष्ट्ये किंवा अनेक वैशिष्ट्ये जीवनाला मानवाने आदरणीय मानलेच पाहिजे असे काही मूल्य प्रदान करतात? जर जीवनालाच मूल्य असेल तर सूक्ष्म जीव आणि झाडेही स्वाभाविक मूल्य असलेल्या गटाच्या परिघात येतात''[१४]. संपूर्णवाद विरुध्द व्यक्तिवाद या मुद्याशी साधर्म्य राखणारा अजून एक मुद्दा म्हणजे, ''केवळ एकल जीवालाच मूल्य असते का सजीवांच्या प्रजाती किंवा सारी परिसंस्था किंवा एकूण सारे वनसंपदाक्षेत्र किंवा सारे जीवावरण (गया - या गृहितकात जीवावरण यालाच एक सजीव घटक मानले जाते) यांना मूल्य असते ? हा प्रश्न उरतो''[१५].

निसर्गातील कोणत्या गोष्टींना मूल्य आहे किंवा काही वेळा वापरल्या जाणाऱ्या शब्द प्रयोगात सांगावयाचे तर कोणत्या गोष्टी नैतिक विचारास पात्र आहेत, म्हणजेच नैतिक विचार केला पाहिजे अशा गोष्टीच्या परीघत येतात याचा एकदा निर्णय झाला की पुढचा प्रश्न म्हणजेच त्यांचा विचार कसा करावा हा प्रश्न निर्माण होतो. आणि हा प्रश्न वरील विवेचनावरुन वाटतो तेवढा सोपा सरळ नाही,

तर अवघड व क्लिष्ट आहे.

सद्य:परिस्थितीत आवश्यकता आहे, ती पर्यावरणीय समस्यांबाबत गंभीरपणे विचार करणाऱ्या योग्य नैतिक आधाराची. जॉन पासमोरसारख्या अन्य लेखकांनी स्पष्टपणे मनुष्यकेंद्री दृष्टिकोन स्वीकारला आहे. तसेच समर्थनासाठी दिलेला विहितकांबाबत (आधार) गंभीरही आहेत. आणि डीप एनव्हायर्नमेंटालीझमसारखा (सकल पारिस्थितीकी) एक निसर्गकेंद्रीत आमुलाग्र नवा विचार पर्यावरणीय दृष्टिकोन म्हणून सूचित केला गेला आहे. या दोन्ही दृष्टिकोनाचे अनेक फायदे असल्याने हा विषय काहीसा क्लिष्ट आहे. बऱ्याच गोष्टी केवळ नैतिक किंवा तात्विक बाबींवर नव्हे, तर मानवाचे निसर्गाशी नाते कसे आहे याचे आपले आकलन कसे आहे यावर अवलंबून आहेत.

पर्यावरणीय नीतिशास्त्राने तात्विक दृष्टिकोनातून आपल्यापुढे उभे केलेले आव्हान म्हणजेच नैतिकतेचे स्वरुप आणि विशेष करून इतरांप्रती असलेली आपली कर्तव्ये याकडे काळजीपूर्वक पाहण्याची आवश्यकता सर्वसामान्य नैतिक विचारांमध्ये आपल्या नैतिक नातेसंबंधाचा विचार अगदीच संकुचितपणे केलेला असतो. म्हणजे ही व्याप्ती आपल्याच समाजात राहणाऱ्या, समकालीन मानवाबाबत (भविष्यकालीन पिढ्यांचा यात समावेश होत नाही) आणि एकंदरीतच सर्व मानवी समूहासंदर्भात एवढीच असते.

सारांश, असा की पर्यावरणीय नैतिक भूमिका या पारंपारिक नैतिक किंवा तात्विक विचारांच्या चौकटीत सहजपणे बसवता येऊ शकत नाहीत. पारंपरिक संकल्पनांचा नव्या परिस्थितीत केवळ विस्तार करण्यापेक्षा आणखी कशाची तरी आवश्यकता आहे, असे यातून दिसते. खरे तर पर्यावरणीय नीतिशास्त्राला पूर्णतया वेगळेच आधार असल्याचे दिसते. जुन्या संकल्पनेनूसार एका मानवाचा दूसऱ्या मानवाशी, तसेच एका मानवाच्या त्यांच्या समुहाशी काही स्वाभाविक मूल्य असल्याने त्यांच्या बाबत कर्तव्ये आहेत. यावर आधारलेल्या होत्या, तर "नव्या पर्यावरणीय नीतिशास्त्रामध्ये जणू एकट्या मानवाचेच स्वाभाविक मूल्ये आहे, असे नव्हे तर मानवेतरांबाबतही आणि अगदी निर्जीव गोष्टी बाबतीतही (परिसंस्था, नद्या, डोंगर, इ) मानवाची काही कर्तव्ये आहेत असे अभिप्रेत असल्याचे दिसते"[१६]. या नैतिक विचारांच्या व्याप्तीमध्ये साऱ्या जगातील मानव, भावी पिढ्या, आणि मानवतेवर जीवनाचाही किंवा एकंदर नैसर्गिक विश्वाचाही समावेश करण्याचे आवाहन केले जाते. काही पर्यावरणवादी मानवतेवर जीवन हे मानवी हितसंबंध आणि गरजांपेक्षा नैतिक दृष्टिकोनातून अधिक महत्वाचे आहेत असे मानणारे आहेत ही अधिक मुलगामी भूमिका स्वीकारण्यासाठी साऱ्या व्यवस्थेतील मानवाच्या स्थानबाबतचा एक पूर्ण वेगळा दृष्टीकोन स्वीकारण्याची आवश्यकता दिसते. थोडक्यात तात्विक पातळीवर आपल्या तत्वांमध्ये आमुलाग्र बदल आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :**

१) द.एनव्हायर्नमेंट, प्रॉब्लेम अँड परस्पेक्टीव्हज, एनसायक्लोपेडिआ ऑफ एनव्हायर्नमेंटल मॅनेजमेंट, खंड १, पृष्ठ - ६९.

२) तत्रैव, पृष्ठ ६९-७३.

३) जॉन पासमोर, मॅन्स रिस्पॉन्सिबीलीटी फॉर नेचर, हार्पर अँड रो, न्युयॉर्क, १९८०, पृष्ठ - १४.

४) बायबल.

५) इ.एफ.शुमाखर, स्मॉल ईज ब्युटीफुल, हार्पर अँड रो, न्युयॉर्क, १९७३, पृष्ठ - १

६) इ.एफ.शुमाखर, तत्रैव, पृष्ठ - १४८.

७) इ.एफ.शुमाखर, तत्रैव, पृष्ठ - ३८.

८) इ.एफ.शुमाखर, तत्रैव, पृष्ठ - ३०.

९) संतोषकुमार पॉल, एनव्हायर्नमेंटल एथिक्स : ए डीफेन्स ऑफ नॉन-अँथ्रोपोसेंट्रीझम, जर्नल ऑफ फिलॉसॉफी, विद्यासागर युनी. २०००, पृष्ठ - ४९.

१०) तत्रैव पृष्ठ - ४९.

११) तत्रैव पृष्ठ - ४९.

१२) नागेल डॉवर, व्हाट इज एनव्हायर्नमेंटल एथिक्स, एथिक्स अँड एनव्हायर्नमेंटल, रिस्पॉन्सिबीलीटी, संपा. नागेल डॉवर, अॅव्हबरी, १९९६, पृष्ठ - ११.

१३) अल्डो लिओपोल्ड, द सॅड कॉऊंटी अल्मनॉक : विथ द अदर एसेज ऑन कॉन्झरवेशन फ्रॉम राऊंड रीव्हर, ऑक्सफर्ड युनी. प्रेस, ऑक्सफर्ड, १९५३ पृष्ठ - २६२.

१४) नागेल डॉवर, व्हाट ईज एनव्हायर्नमेंटल एथिक्स, उनि. पृष्ठ - २५.

१५) नागेल डॉवर, तत्रैव, पृष्ठ - २९.

१६) एरीक मॅथ्युज, द मेटॅफीजीक्स ऑफ एनव्हायर्नमेंटलीझम, एथिक्स अँड द एनव्हायर्नमेंटल रिस्पॉन्सिबीलीट, संपा.नागेल डॉवर, अॅव्हबरी, १९९६ पृष्ठ - ४३.

❑❑❑